


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे | अंक : ३३८ वा | बुधवार दि ०८ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# देशातील चार राज्यांमध्ये निवडणुका, पण हवामानातील टोकाची स्थिती गंभीर धोका; मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम?

**वृत्तसंस्था/मुंबई**

एप्रिल महिन्यात पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू आणि केरळ या चार भारतीय राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत असताना, हवामानातील वाढती टोकाची परिस्थिती ही निवडणुकीच्या तयारीसाठी गंभीर धोका म्हणून समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुका होणाऱ्या राज्यांसाठी वर्तवलेले हवामानाचे इशारे लक्षात घेऊन निवडणुकीच्या दिवसासाठी तयारी व्हायला हवी, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या चारही राज्यांमध्ये २.१९ लाख मतदान केंद्रे असून १७.४ कोटी मतदार मतदान करणार आहेत. या राज्यांमधील एप्रिलमधील गेल्या पाच वर्षांची हवामानाची आकडेवारी आणि भारतीय हवामान विभागाने यंदा एप्रिलसाठी दिलेला अंदाज पाहता वाढती उष्णता, आर्द्रता, मेघगर्जना, विजा हे घटक निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत, याकडे ङ्गक्लायमेट ट्रेंड्सफ या मंचामार्फत लक्ष वेधण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांतील आकडेवारी पाहता एप्रिल महिना अधिक उष्ण झाल्याचे दिसत आहे. तसेच आर्द्रतेचे प्रमाणही अधिक आहे. एप्रिल २०२२ मध्ये सरासरीपेक्षा १.३६ अंश सेल्सिअसने तापमान अधिक होते. उष्णतेसोबतच वातावरणही बेभरंवशाचे झाले आहे, असेही समोर येते. गेल्या काही काळात पावसाची तीव्र तूट किंवा अतिरिक्त पावसाचीही नोंद झाली आहे. हे वातावरण मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम करणारे ठरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. आसाममध्ये निवडणुकीच्या आधीच्या काळात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तसेच मेघगर्जनाही होऊ शकते. पश्चिम बंगालमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. येथे मेघगर्जनेसह पाऊस तसेच विजांचीही शक्यता आहे. तमिळनाडू आणि केरळमध्ये अधिक प्रमाणात उष्णता आणि आर्द्रता जाणवू शकते. त्यामुळे प्रत्यक्ष तापमानापेक्षा अधिक तापमान जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे अधिक अस्वस्थता जाणवू शकते. पूर्व किनारपट्टीवर एप्रिलमध्ये सरासरीहून अधिक उष्णतेच्या लाटा निर्माण होऊ शकतात, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. पूर्व किनारपट्टीवर पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या राज्यांचा समावेश आहे. ही वातावरणीय स्थिती निवडणुकीवर विविधांगी परिणाम करू शकते, असे ङ्गस्कायमेट वेदरफ्चे उपाध्यक्ष महेश पलावत यांनी सांगितले. एप्रिलमधील वातावरण हे तीव्र होत असल्याने निवडणुकीची तयारी करताना त्यासाठी सज्जता गरजेची आहे. यात उष्णतेशी सामना करण्याची तयारी, वादळासाठीची पूर्वतयारी, सुरक्षेच्या



उपाययोजना यांचा विचार आवश्यक असल्याचे या विश्लेषणात स्पष्ट करण्यात आले आहे. यासाठी निवडणूक आयोगाची तयारी असल्याचे अधिकाऱ्यांतर्फे सांगितले जात आहे. त्याच वेळी निवडणुकांमुळे वातावरण बदलाला कसा हातभार लागत आहे, याचाही विचार झाला पाहिजे, असे आवाहन माजी मुख्य निवडणूक अधिकारी ओ. पी. रावत यांनी केले.

# भाजपचा २०२९ चा प्लॅन तयार, पुण्यात रवींद्र चव्हाण यांच्या कार्यकर्त्यांना सूचना...

**वृत्तसंस्था/ पुणे**

आगामी २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या गोटात सध्या मोठ्या घडामोडी सुरु आहेत. भाजपकडून मोर्चबांधणी केली जात आहे. पक्षाला अधिक बळकट करण्यासाठी भाजपकडून रणनीती आखली जात आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज पुण्यातील भाषणात केलेल्या वक्तव्यावरुन याची प्रचिती येताना दिसत आहे. रवींद्र चव्हाण यांनी सर्व भाजप कार्यकर्त्यांन महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. पुण्यात भाजपच्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित ङ्गसक्रिय कार्यकर्ता संमेलनातफ पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना संघटन बळकट करण्याचा आणि नव्या पद्धतीने काम करण्याचा स्पष्ट संदेश दिला. बालगंधर्व रंगमंदिर येथे पार पडलेल्या या मेळाव्यात राज्यभरातील कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. या संमेलनाच्या माध्यमातून पक्षाची पुढील दिशा, रणनीती आणि संघटनात्मक ताकद अधिक




वाढवण्यावर भर देण्यात आला.यावेळी बोलताना चव्हाण यांनी पक्षाच्या वाढत्या ताकदीचा उल्लेख केला. ङ्गङ्गआज आपल्या पक्षाकडे दीड कोटी सदस्य असून अडीच लाखांहून अधिक सक्रिय कार्यकर्ते आहेत. ही मोठी ताकद आहे. मात्र, बदलत्या काळानुसार आपल्यालाही कामाची पद्धत बदलावी लागेल,फ्फ असे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल युगात सोशल मीडियाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी कार्यकर्त्यांना फ सबुक, व्हॉट्सॲपसारख्या प्लॅटफॉर्मवर सक्रिय होण्याचे आवाहन केले. आजच्या राजकारणात नॅरेटिव्ह खूप महत्त्वाचा ठरतो. जो कोणी चुकीचा किंवा दिशाभूल करणारा नॅरेटिव्ह तयार करतो, त्याला तिथेच ठामपणे उत्तर देणं गरजेचं आहे. सोशल मीडियावर सक्रिय राहिल्यास त्याचा सकारात्मक परिणाम जनतेपर्यंत पोहोचतो,फ्फ असेही त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांनी केवळ मैदानातच नव्हे तर डिजिटल स्तरावरही पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडावी, असा संदेश त्यांनी दिला. या संमेलनात त्यांनी आगामी २०२९ च्या राजकीय लक्ष्यावरही भाष्य केले. ङ्गङ्गआपल्यासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यातील काही आव्हाने उघडपणे सांगता येत नाहीत, पण बूथ स्तरावरचे कार्यकर्ते ती जबाबदारी सक्षमपणे पार पाडत आहेत. जर सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार केला, तर २०२९ पर्यंत आपण अपेक्षित असलेली मजबूत भाजपा उभी करू शकतो,फ्फ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरवर्षी ६ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त देशभरात अशा प्रकारच्या संमेलनांचे आयोजन केले जात आहे. मुंबईनंतर पुण्यात हा कार्यक्रम पार पडला असून येत्या काही दिवसांत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्येही अशाच बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांद्वारे कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षाची विचारधारा आणि भविष्यातील योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

# कुंभ हवा; पण करवती आवरा!



धर्म-अध्यात्माचा जागतिक उत्सव असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून नाशिक महानगरपालिका आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी पुन्हा एकदा वृक्षराजीकडे मोर्चा वळवला आहे. पुरातन, डेरदार वृक्षांची निष्ठूर कत्तल सुरू आहे, ज्यामुळे ङ्ग हरित नाशिक म ही ओळख पुसली जाण्याची भीती आहे. दुर्दैवाने या खेपेला या त्याविरोधात लोकचळवळ उभी राहताना दिसत नाही. निवडक पर्यावरणवादी वगळता सारेच हताशपणे बघत आहेत. हे सारे शहराच्या मुळावर उठणारे आहे. मात्र, सत्ताधारी राजकीय व्यवस्था आणि बाबूशाहीच्या संगनमतापुढे जणू सारेच हतबल झाल्याचे दिसते. काही महिन्यांपूर्वीच तपोवनातील अठराशे झाडे तोडण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर यावरून बरेच ङ्गरामायणफ घडल्यानंतर हा विषय ङ्गठंडा करके खाओफ नीतीनुसार हाताळण्यात आला. आता कोणती निवडणूक नसल्याने कसला अडथळाही नाही. त्यामुळे शहरभरातील रस्ते खोदल्यानंतर आता वृक्षांची कत्तर सुरू आहे. त्यासाठी विकासकामे आणि रस्ते रुंदीकरणाचे कारण दिले जाते. तपोवनातील संभाव्य वृक्षतोडीबाबत हरित लवादाने गंभीर निरीक्षण नोंदवले, नेमके त्याच दिवशी या वृक्षसंपदेवर चाल केली गेली. शेकडो यांत्रिक करवती, यंत्रे, ट्रक व अन्य सामग्रीसह तगडा फौजफाटा मैदानात उतरला आहे. आठ-दहा दिवसांत हजारेक झाडांचे नामोनिशाण मिटविण्याचा चंग यंत्रणेने बांधलेला दिसतो. खुद्द मुख्यमंत्री नाशिकचा कुंभमेळा पर्यावरणपूरक, नशामुक्त व वैश्विक ठरणार असल्याचे सांगतात. संस्कृती आणि परंपरेचा सन्मान राखत एकजुटीने पुढे जाण्याची ग्वाही ते देतात. प्रत्यक्षात मात्र या सोहळ्यासाठी महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरण झाडांवर वरवंटा फिरवत आहेत. सिंहस्थासाठी शहराची नवी ओळख बनविताना जुनी ओळख मात्र पुसली जात आहे. केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर नाशिकच्या लौकिकाला नख लावण्याचे उद्योग सुरू आहेत. काँक्रिटीकरणाच्या विकासाची फळे चाखताना, खरीखुरी फळेफुले भुईसपाट केली जात आहेत. काही लोकांना या वृक्षतोडीच्या विरोधात शड्डू ठोकायचे आहेत; परंतु सनातन परंपरेच्या आणाभाका दिल्या जात असल्याने ङ्गतोंड दाबून बुक्क्यांचा मारफ अशी त्यांची अवस्था झाली आहे. सोशल मीडियाचेसुद्धा अवसान गळाले आहे. काही झाडे रस्त्याच्या मधोमध आहेत. तेथे अपघात घडून अनेक प्रवाशांचा बळी गेला आहे. त्यामुळे ङ्गसुंठेवाचून खोकला गेलाफ म्हणत काही रहिवासी या तोडीपासून अंतर ठेवून आहेत. बोटांवर मोजण्याइतकेच वृक्षप्रेमी प्रशासनाविरोधात उभे ठाकले आहेत. महाकाय वटवृक्षांच्या पुनर्रोपणाच्या पर्यायाची सक्षमपणे अंमलबजावणी झाल्यास काही प्रश्न नक्कीच सुटतील. परंतु, या किचकट भानगडीत यंत्रणेला पडायचे नसल्याने त्यावर फुली मारण्यात आली आहे. अर्थात, मागील कुंभमेळ्यासाठी हटवून इतरत्र लावली गेलेली अशी किती झाडे जगली, हासुद्धा संशोधनाचा विषय. बरे, काही शे-पन्नास वर्षे वयाच्या झाडांना न्यायालयाने अभय दिले असूनही यंत्रणा जुमानायला तयार नाही. भल्यामोठ्या क्रेनही उचलू न शकणारे महाकाय वृक्ष केवळ पाच-पंचवीस वर्षांचे असल्याचे दावे केले जात आहेत. तसे कागद आधीच रंगवले गेले आहेत. दर बारा वर्षांनी नाशिकचा कायापालट होतो, तेव्हा त्याचा पहिला आणि सर्वांत मोठा फटका हिरव्याकंच वृक्षसंपदेला बसतो. येथील संस्कृती, परंपरा व वारशाचा अविभाज्य भाग असलेली वृक्षराजी संपविणे हा जणू अजेंडा घेऊनच काही लोक काम करतात. सध्या रस्तोरस्ती कापून पडलेल्या झाडांच्या बुंध्याबांध्यांचे ढीग पाहून मन हेलावते. धर्माची भूमिका निसर्गाला पूरक राहिली आहे. विकासकामे नक्कीच हवी आहेत, परंतु, ती शाश्वत व निसर्गाशी नाते जपणारी असावीत. कारण तोच खरा धर्म आहे. आज अनेक डेरेदार वृक्ष अनाम, एकाकीपणे धारातीर्थी पडत आहेत. वृक्षतोडीला विरोध करणाऱ्या मोजक्या पर्यावरणप्रेमींची साद करवतींच्या कर्कश आवाजात हवेत विरून जात आहे. इतिहास मात्र या कृतघ्नपणाची नकोशी नोंद घेईल, हे प्रशासनाने लक्षात ठेवावे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# इराण विरोधात अणुबॉम्बचा वापर करणार? जेडी व्हान्स यांच्या विधानामुळं खळबळ

## ट्रम्प यांची इराणला धक्कादायक धमकी; अणुयुद्धाची भीती..

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'इराणची संपूर्ण संस्कृती आज रात्री नष्ट होईल', अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी टृथवरील पोस्टमधून दिल्यानंतर संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे. इराणला दिलेली ४८ तासांची मुदत संपुष्टात येत असून इराणने जर माघार घेत करार केला नाही तर त्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, असे ट्रम्प यांनी ताज्या पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी म्हटले की, आमच्याकडे अशी साधने आहेत जी आम्ही अजून वापरलेली नाहीत. या दोघांच्या विधानांचे वेगवेगळे अर्थ जगभरातील माध्यमे आता काढत आहेत.

ट्रम्प यांनी टुथ सोशल मीडिया साईटवर लिहिलेल्या पोस्टमधील मजकूर आधी पाहू. त्यांनी लिहिले, "आज रात्री एक संपूर्ण संस्कृती नष्ट होईल. जी पुन्हा परत कधीही आणता येणार नाही. असे व्हावे, अशी माझी बिलकुल इच्छा नाही. पण कदाचित ते होईलच."

"तथापि, आता पूर्ण सत्तापालट होणार आहे. जिथे वेगळ्या प्रकारचे, हुशार आणि कमी कट्टरतावादी विचारांच्या लोकांचे वर्चस्व असेल. सध्या ठाऊक नाही, पण ते कदाचित काहीतरी क्रांतिकारक अद्भुत असे घडवू



शकतील. जगाच्या प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या इतिहासातील आजच्या सर्वात महत्त्वाच्या रात्रीच ते कळू शकेल. ४७ वर्षांची लूटमार, भ्रष्टाचार आणि मृत्यूचे तांडव अखेर संपुष्टात येईल", असेही ट्रम्प पुढे म्हणाले आहेत.

'इराणच्या महान लोकांवर देवाचा आशीर्वाद असो', असेही वाक्य या पोस्टच्या शेवटी ट्रम्प यांनी म्हटले आहे. यावरून ट्रम्प नेमके काय सूचित करू इच्छितात, याचा मात्र अंदाज नाही. व्हान्स पुढे म्हणाले की, ही शस्त्रास्त्रे वापरायचा निर्णय राष्ट्राध्यक्ष ट्रम्प घेऊ शकतात. जर इराणने आपली भूमिका बदलली नाही तर ती वापरायचा निर्णय ते घेऊ शकतात. सोमवारी सकाळी ट्रम्प यांनी म्हटले होते, "इराण एका रात्रीत उद्ध्वस्त केला जाऊ शकतो." राष्ट्राध्यक्ष

### व्हाईट हाऊसने अण्वस्त्राची शक्यता फेटाळली

दरम्यान व्हाईट हाऊसने मात्र उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांच्या विधानानंतर सुरू झालेली अण्वस्त्राच्या वापराची चर्चा फेटाळून लावली. आमच्याकडे अशी शस्त्रास्त्रे आहेत, ज्याचा वापर करण्याचा निर्णय आम्ही अद्याप घेतलेला नाही, या विधानावर स्पष्टीकरण देताना व्हाईट हाऊसने म्हटले की, उपाध्यक्षांचा बोलण्याचा तसा अर्थ निघत नाही.

आणि उपाध्यक्ष यांच्या पाठोपाठ आलेल्या विधानानंतर अमेरिका अण्वस्त्रांचा वापर करेल का? अशी भीती जगभरात निर्माण झाली आहे.

वृत्तानुसार, ट्रम्प यांचे विद्यमान आणि माजी सल्लागार वर्तुळात अशी भीती वाढत आहे की, राष्ट्राध्यक्ष इराणवर अणुहल्ला करण्याचा विचार करू शकतात. ब्रिटिश लेखक आणि पत्रकार ओवेन जोन्स यांनी सोशल मीडियावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, डोनाल्ड ट्रम्प इराणविरोधात अण्वस्त्रे वापरण्याची स्पष्टपणे धमकी देत आहेत. ही आपत्ती टाळण्यासाठी

### उपाध्यक्ष व्हान्स यांचे विधान काय?..

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या संस्कृतीचा विनाश करण्याची पोस्ट केल्यानंतर काही वेळेतच उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांचेही खळबळजनक विधान समोर आले. इराणला इशारा देताना व्हान्स म्हणाले की, अमेरिकेने आपली बहुतेक लष्करी उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. आता काही तासांची वेळ उरली आहे. त्यांना (इराण) हे कळायला हवे की, आमच्याकडे अशी शस्त्रास्त्रे आहेत, ज्याचा वापर करण्याचा निर्णय आम्ही अद्याप घेतलेला नाही.

त्यांना अध्यक्षपदावरून हटवले पाहिजे.

संयुक्त राष्ट्रांचे राजनयिक आणि पॅट्रिऑटिक व्हिजन असोसिएशनचे संयुक्त राष्ट्रांमधील दीर्घकाळ प्रतिनिधी असलेल्या मोहम्मद सफा यांनी काही दिवसांपूर्वी याच प्रकारचा गंभीर आरोप केला होता. "संयुक्त राष्ट्रे इराणमध्ये संभाव्य अण्वस्त्र वापराची तयारी करत असताना आपण याचे साक्षीदार होऊ इच्छित नाही", असे सांगत सफा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून १२८ कोटींची मदत

**मुंबई :** राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना १२८.८६ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झाले होते. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण १,४५,६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २,३३,८९० शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

या पावसामुळे केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या अवकाळी पावसामुळे पाच लोकांचा मृत्यू आणि नऊ लोक जखमी झाले. अवकाळी पावसामुळे ३६ जनावरांचाही मृत्यु झाला आहे.

## खेरा यांच्या निवासस्थानाची झडती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा आणि त्यांच्या कुटुंबीयांबाबत करण्यात आलेल्या आरोपांशी संबंधित प्रकरणात मंगळवारी आसाम पोलिसांच्या पथकाने दिल्लीतील काँग्रेस नेते पवन खेरा यांच्या निवासस्थानी झडती घेऊन चौकशी केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



आसाम पोलीस उपायुक्त देबोजित नाथ यांनी सांगितले की, "खेरा हे त्यांच्या निवासस्थानी नव्हते. त्यांच्या निवासस्थानी झडतीमध्ये पोलिसांनी इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली आहेत. पोलिसांना काही आक्षेपार्ह साहित्य मिळाले आहे." खेरा यांचा शोध घेण्यात येईल, असेही नाथ यांनी सांगितले. मुख्यमंत्री सरमा यांच्या पत्नीकडे तीन पारपत्रे आहेत.

याशिवाय त्यांच्या मालमत्तेबद्दलची माहिती निवडणूक प्रतिज्ञापत्रात लपवण्यात आली असल्याचा आरोप खेरा यांनी केला होता.

### सरमा आक्रमक..

खेरा यांनी ज्या कागदपत्रांच्या आधारे आपल्यावर आरोप केले त्याची पडताळणी केली गेली नव्हती असा दावा करून हिमांता बिस्वा सरमा यांनी काँग्रेसवर टीका केली. तसेच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे वय झाले असून ते वेड्यासारखे बोलत आहेत, असेही ते म्हणाले. खेरा यांनी केलेल्या आरोपांची केंद्रीय तपास संस्थांमार्फत चौकशी करावी अशी मागणी खरगे यांनी केल्यामुळे सरमा यांनी संताप व्यक्त केला.

यावर काँग्रेसने खोटी माहिती दिल्याचा आरोप मुख्यमंत्री सरमा यांनी केला. त्यांनी म्हटले की, पाकिस्तानी समाजमाध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या पत्नीवर बिनबुडाचे आरोप करण्यात आले आहेत.

## मुंबई-मीरा-भाईंदर प्रवास होणार जलद : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/वृत्तसंस्था :** मुंबईला देशातील सर्वाधिक सुगम आणि एकात्मिक वाहतूक व्यवस्था असलेले शहर बनविण्याचा संकल्प असून मल्टी-मोडल इंटिग्रेशनच्या माध्यमातून नागरिकांना अखंड आणि सुलभ प्रवासाचा अनुभव देण्यावर राज्य शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई मेट्रो लाईन २ ब (डी. एन. नगर ते मंडाले) चा पहिला टप्पा देशभक्त एन.जी. आचार्य उद्यान – डायमंड गार्डन ते मंडाले या मार्गाचे लोकार्पण तसेच पॉड टॅक्सी प्रकल्पाचे ई भूमिपूजन झाले. चेंबूर येथील देशभक्त एन.जी. आचार्य उद्यान – डायमंड गार्डन मेट्रो स्थानक येथे झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, आमदार सना मलिक, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुंबई मेट्रो लाईन 2 ब (डी.एन. नगर ते मंडाले) च्या कोनशिलेचे अनावरण तसेच पॉड टॅक्सीसंदर्भातील बीकेसी कनेक्ट कंपनीने तयार केलेल्या कॉफीटेबल बुकचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.

मेट्रो 2 ब चा 5.6 किमीचा पहिला टप्पा आणि पाच स्थानके आजपासून सुरू होत असून उर्वरित दोन टप्पे पूर्ण झाल्यानंतर मुंबईत मोठ्या प्रमाणावर सुसंगत आणि जलद कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पामुळे



पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण मुंबई एकमेकांशी प्रभावीपणे जोडली जाणार असून, भविष्यात बीकेसी, अंधेरी, वांद्रे आणि चेंबूरपर्यंत अखंड प्रवास सुलभ होणार आहे. विशेष म्हणजे ही मेट्रो हार्बर लाईनला जोडणारी पहिली मेट्रो ठरत असल्याने वाहतूक व्यवस्थेत नवा अध्याय सुरू होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पातील सर्व स्थानके आयजीबीसी प्लॅटिनम मानांकित असून ऊर्जा बचत आणि नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर यावर भर देण्यात आला आहे. मंडाले येथे उभारण्यात आलेला दुहेरी मजल्याचा डेपो देशातील सर्वात मोठ्या डेपो पैकी एक असून दोन मजल्यांमध्ये 72 लाईन्सची सुविधा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# 90 लाखांहून अधिक नावे वगळली; निवडणुकीआधी राजकीय वाद तीव्र

**कोलकाता/वृत्तसंस्था :** विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेनंतर पश्चिम बंगालमधील मतदारयाद्यांमधून ९० लाख ८३ हजार नावे वगळण्यात आली आहेत. यात न्यायिक पडताळणी करण्यात आलेल्या ६० लाख मतदारांतून अपात्र ठरवण्यात आलेल्या २७ लाख १६ हजार मतदारांचाही समावेश आहे. या मतदारांना न्यायाधिकरणाकडे दाद मागण्याची मुभा आहे. मात्र मतदानाच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदार यादी जाहीर झाल्याने १४ लाख मतदारांना यावेळी विधानसभा निवडणुकीत मतदानाची संधी मिळणार नाही.

उर्वरित १२ लाख मतदारांना लवादाकडे दाद मागता



येईल. दुसऱ्या टप्प्यासाठी ९ एप्रिल रोजी मतदार यादी प्रकाशित होणार आहे. दोन दिवसांत लवादाने ही नावे समाविष्ट करण्यास परवानगी दिली तरच त्यांना मतदान करता येईल. मुस्लिमबहुल मुर्शिदाबाद जिल्ह्यातून सर्वाधिक ११ लाख एक हजार नावांपैकी चार लाख ५५ हजार नावे रद्द करण्यात आली.

बांगलादेश सीमेलगतच्या उत्तर २४-परगाणा जिल्ह्यात तीन लाख २५ हजार वगळली गेली आहेत. मालदा येथे ८ लाख २८ हजार मतदारांपैकी २ लाख २९ हजार मतदारांना अपात्र ठरविण्यात आले. विशेष म्हणजे नादिया, उत्तर २४ परगणा या हिंदू मतुआ समाजाची जास्त लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांतूनही मोठ्या प्रमाणात नावे वगळण्यात आली आहेत. दक्षिण कोलकाता मतदारसंघातून २८ हजार नावे वगळण्यात आली असून, यात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भवनीपूर मतदारसंघात येतो. उत्तर कोलकात्यात ३९ हजार नावे कमी करण्यात आली आहेत. ममतांची टीका राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मतदार वगळण्यात आल्याबद्दल निवडणूक आयोग आणि भाजपवर टीका केली. 'मतुआ, राजबन्शी आणि अल्पसंख्य समाजालाच लक्ष्य करण्यात आले आहे. मुर्शिदाबाद, मालदा, उत्तर दिनजापूरमधून मुस्लीम मतदार वेचून वेचून वगळण्यात आले आहेत,' असा आरोप त्यांनी केला. तर बांगलादेशी नागरिक आणि मृत मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा दावा भाजपचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 15 जिलेटीन कांड्या, 58 डिटोनेटर, नागपुरात संवेदनशील भागात विस्फोटकांचा साठा सापडला

**नागपूर :** नागपूर शहरातील सीए रोड परिसरात मोठ्या प्रमाणात जिवंत विस्फोटक आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. गणेशपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील दोसर भवन चौकात, मेट्रो स्टेशनच्या अगदी शेजारी आणि अत्यंत संवेदनशील भागात ही घटना उघडकीस आली. आज सकाळी एका घराच्या परिसरात संशयास्पद बॅग असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही धक्कादायक बाब समोर आली. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित बॅगमध्ये तब्बल १५ जिलेटीन कांड्या, ५८ डिटोनेटर आणि ८ कनेक्टर आढळून आले. ही बॅग गेल्या एक ते दीड महिन्यांपासून त्या ठिकाणी पडून असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. आज सकाळी त्या बॅगमधील जिलेटीन कांड्या बाहेर दिसू लागल्यामुळे घरमालकाच्या लक्षात हा प्रकार आला आणि त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांसह बॉम्ब शोधक आणि नाशक पथक (BDDS) दाखल झाले. त्यांनी तात्काळ परिसर सील करून शोधमोहीम राबवली. तपासादरम्यान सर्व विस्फोटक साहित्य सुरक्षितपणे जप्त करण्यात आले असून ते पुढील तपासासाठी अज्ञात स्थळी हलविण्यात आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हा साठा आढळला तो परिसर अत्यंत संवेदनशील मानला जातो. घटनास्थळापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर जामा मशिद, ५०० मीटरवर पोद्दारेश्वर राम मंदिर आणि दीड ते दोन किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आहे. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य अधिक वाढले आहे.,दरम्यान, प्राथमिक तपासात नागपूर जिल्ह्यातील काटोल परिसरातील एसबीएल कंपनीत झालेल्या स्फोटाशी या विस्फोटकांचा संबंध असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. संबंधित कंपनीतील स्फोटक साहित्य बेवारस अवस्थेत येथे आणून टाकण्यात आले असावे, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही.



पोलिस उपायुक्त राहुल मदने यांनी सांगितले की, घटनास्थळावरून आढळलेले सर्व साहित्य सुरक्षित करण्यात आले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, हे विस्फोटक येथे कोणी आणि कोणत्या उद्देशाने ठेवले याचा शोध घेतला जात आहे. तसेच, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे संशयितांचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, कोणतीही संशयास्पद वस्तू दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मुलाचा जन्मदात्या आईवरच जीवघेणा हल्ला, पोलिसांनाही धक्काबुक्की

**पुणे :** पुण्यात पुन्हा एकदा नात्यांना काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. विश्रांतवाडी परिसरात एका मुलाने स्वतःच्या जन्मदात्या आईवरच जीवघेणा हल्ला केल्याने खळबळ उडाली आहे. इतकंच नाही, तर आईला वाचवण्यासाठी आलेल्या पोलिसांनाही त्याने मारहाण करत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. ही घटना फुलेनगर, येरवडा परिसरात घडली. श्रेयश संजय कोराड (वय ३०) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तरुण मद्यधुंद अवस्थेत आपल्या ५५ वर्षीय आईशी वाद घालत होता. वाद इतका विकोपाला गेला की त्याने आईला शिवीगाळ करत मारहाण सुरू केली आणि तिला जीवे मारण्याची धमकी दिली.या प्रकाराची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतापलेल्या आरोपीने पोलिसांच्याच अंगावर धाव घेतली. एका पोलीस अंमलदाराची कॉलर पकडून त्यांना खाली पाडले, धक्काबुक्की केली आणि त्यांच्या गणवेशाची बटणेही तोडली.यावेळी मदतीला आलेल्या दुसऱ्या पोलीस कर्मचाऱ्यालाही त्याने शिवीगाळ करत धमकावले. परिस्थिती अधिक चिघळत असल्याने अतिरिक्त पोलीस पथक बोलवावे लागले. तरीही आरोपीचा आक्रमकपणा कमी झाला नाही. त्याने पुन्हा पोलिसांना मारण्याची धमकी दिली.शेवटी पोलिसांनी संयम राखत आरोपीला ताब्यात घेतले. सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, पोलिसांवर हल्ला करणे आणि जीवे मारण्याची धमकी देणे अशा गंभीर कलमांखाली त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मद्याच्या नशेत माणूस किती हिंसक होऊ शकतो याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आहे. पुण्यात वाढत्या कौटुंबिक वादांमुळे अशा घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंताही व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातही आई आणि मुलाच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. शिरुर तालुक्यातील भांबर्डे गावात एका महिलेने आपल्या 11 महिन्याच्या लेकाचा जीव घेतला आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुका हादरला आहे. आई आपल्या पोटच्या लेकराला कसं संपवू शकते? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## 28 वर्षीय तरुणाची आढळली बॉडी

**छत्रपती संभाजीनगर :** गंगापूर तालुक्यातील शिरजगाव परिसरात शिवना नदीच्या पात्रात एका तरुणाचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे. मृत तरुणाच्या शरीरावर अनेक ठिकाणी जखमा असल्याने हा मृत्यू अपघाती आहे की घातपात आहे, याबाबत पोलिस तपास करत आहे. गणेश अंबादास शिरसाट (वय 28, रा. शिरजगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, गणेश शिरसाट हा मूळचा शिरजगाव येथील रहिवासी होता.

शिरसाट कुटुंबीतल तो एकुलता एक तरुण असून तो अविवाहित होता. काही दिवसांपूर्वीच त्याच्या आईचं निधन झालं. त्यामुळे तो वडिलांसह राहत होता. त्याला तीन विवाहित बहिणी आहेत. सकाळी 8 वाजेच्या सुमारास नदीपात्रात मृतदेह तरंगताना पोलीस पाटलांच्या निदर्शनास आला. त्यांनी तातडीने गंगापूर पोलिसांना पाचारण केले.घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुमार सिंग राठोड, पोलीस उपनिरीक्षक मस्के तसेच कर्मचारी मनोज घोडके, विजय नागरे, रिजवान शेख, विजय पाखरे हे घटनास्थळी दाखल झाले.

## आईने घेतला 11 महिन्याच्या बाळाचा जीव

**पुणे :** शिरूर तालुक्यातल्या भांबर्डे गावात घडलेली ही घटना ऐकून प्रत्येकाचंच काळीज पिळवटून जात आहे. आई आणि लेकराचं नातं जगातलं सगळ्यात जिव्हाळ्याचं मानलं जातं, पण इथे मात्र एका आईनंच स्वतःच्या 11 महिन्याच्या चिमुकल्याचा जीव घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पूजा पवार... एका छोट्या यशची आई. काही दिवसांपूर्वी ती कोकणातील मुरुडला फिरून आली होती. त्यानंतर यश सतत रडत होता. साधारणपणे आई आपल्या बाळाला शांत करण्याचा प्रयत्न करते, पण इथे मात्र चित्र वेगळंच होतं. सततच्या रडण्यामुळे पूजा चिडचिडी झाली होती. घरातील ताण आणि तिच्या मनात सुरू असलेले दुसऱ्या लग्नाचे विचार यामुळे तिची मानसिक अवस्था ढासळत गेली. हळूहळू तिच्या मनात एक भयानक विचार घर करू लागला "हा मुलगा पुढच्या आयुष्यात अडथळा ठरेल." आणि याच विचाराने तिला अंधाराकडे ढकललं.या धक्कादायक घटनेच्या दिवशी ती यशला घरासमोरील सिमेंटच्या ओट्यावर घेऊन आली. रडणाऱ्या त्या निष्पाप बाळाकडे पाहूनही तिचं मन द्रवलं नाही, तिचं काळीज पिघळलं नाही. संतापाच्या भरात तिनं त्याचं डोकं ओट्यावर आपटलं. त्या एका क्षणात सगळं संपलं. यशचा आवाज कायमचा शांत



झाला आणि यश कायमचा या जगातून गेला. यानंतर तिनं जे केलं, ते आणखी धक्कादायक होतं, निर्दयी होतं. तिनं घरात सांडलेलं रक्त पाण्याने धुऊन काढलं, जणू काहीच घडलं नाही असा आव आणला. मृतदेह कपड्यांच्या बॅगेत भरून तिनं शेतातील विहिरीत टाकून दिला. बॅग वर येऊ नये म्हणून त्यात दगडही टाकले.दरम्यान, यशचे वडील रविंद्र पवार यांनी पोलिसांत तक्रार दिल्यानंतर तपास सुरू झाला. रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी तपास करत एक-एक धागा जोडला आणि अखेर या भीषण गुन्ह्याचं सत्य समोर आलं. पूजाला अटक करण्यात आली आणि पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे भांबर्डे गाव हादरलं आहे. "आईच्याच हातून असं कसं होऊ शकतं?" हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे. एका निष्पाप जीवाचा झालेला हा अंत आणि आईच्या मनात निर्माण झालेला काळोख, या घटनेने संपूर्ण समाजाला विचार करायला भाग पाडलं आहे.

## प्रेमासाठी महिला इंदोरहून पुण्यात आली, हॉटेलमध्ये राहिली, मात्र नंतर वेगळाच अनुभव

**पुणे :** ऑनलाईन मॅट्रिमोनियल साइटवर निर्माण झालेली ओळख किती धोकादायक वळण घेऊ शकते, याचे उदाहरण पुण्यात समोर आले आहे. मॅट्रिमोनियल साइटवर झालेल्या ओळखीनंतर एका व्यक्तीच्या प्रेमात पडून इंदोरहून पुण्यात आलेल्या ४२ वर्षीय पीडितेची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार हडपसर परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणात आरोपी प्रशांत प्रकाश चव्हाण (वय ४२, रा. फुरसुंगी, पुणे) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून तो सध्या फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध वेगाने सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेची ओळख मॅट्रिमोनियल साइटवरून आरोपीसोबत झाली होती. सुरुवातीला गोड



बोलणे, काळजी घेत असल्याचे दाखवणे आणि भविष्याबाबत मोठमोठी स्वप्नं दाखवत आरोपीने महिलेचा पूर्ण विश्वास संपादन केला. "आपण लग्न करू" असे ठाम आश्वासन देत त्याने तिला पुण्यात येण्यास प्रवृत्त केले. आरोपीने सदर महिलेला नोकरीचे आश्वासन दिले आणि पीडित महिला इंदोरचा जॉब सोडून पुण्यात आली. पुण्यात आल्यानंतर चव्हाण याने तिला स्वतःच्या हॉटेलमध्ये कामाला लावले. त्याच हॉटेलमध्ये तिची राहण्याची सोय केली. चार ते पाच महिने पीडित महिला त्याठिकाणी राहिली. त्यावेळी अनेकदा तिच्या इच्छेविरुद्ध आरोपीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. आरोपीने लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर मानसिक दबाव टाकला आणि तिचा गैरफायदा घेतल्याचेही तक्रारीत नमूद आहे.हॉटेलमध्ये काम करत असताना पगाराच्या मुद्द्यावरून दोघांमध्ये वाद झाले. तरीही आरोपी वेळोवेळी "लग्न करू" असे सांगत तिला आश्वासने देत राहिला. मात्र, काही दिवसांपूर्वी त्याने अचानक लग्नास नकार दिला आणि महिलेपासून दूर राहू लागला. तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. मानसिक धक्का बसलेल्या महिलेने अखेर हडपसर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा नोंदवला असून लवकरच आरोपीला अटक होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे ऑनलाईन मॅट्रिमोनियल साइट्सवरील फसवणुकीचे वाढते प्रमाण पुन्हा एकदा समोर आले आहे. अनोळखी व्यक्तींवर लगेच विश्वास ठेवू नये, कोणतीही वैयक्तिक माहिती देताना सावधगिरी बाळगावी आणि संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजस्थानने केला मुंबईचा पालापाचोळा! 11 षटकांच्या थरारात रियान परागच्या संघाचा विजय



**मुंबई/वृत्तसंस्था :** मुंबई इंडियन्सने स्पर्धेतील पहिला सामना जिंकून मात्र पुढील दोन सामने देवाला दिलेत. आता राजस्थान रॉयल्स संघाने चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा घरच्या मैदानावर मोठा पराभव केला आहे. राजस्थान रॉयल्सने पहिल्याच चेंडूपासून आपला दबदबा राखत मुंबई इंडियन्सचा २७ धावांनी पराभव केला आहे. राजस्थानने यासह सुरूवातीचे तिन्ही सामने जिंकत विजयाची हॅटट्रिक लगावली आहे. या विजयासह राजस्थानने गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे.

पावसामुळे ११-११ षटकांच्या या सामन्यात सुरूवातीपासूनच राजस्थान रॉयल्सचा संघ ड्रायव्हिंग सीटवर होता. वैभव सूर्यवंशी व यशस्वी जैस्वालने संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचत राजस्थानच्या गोलंदाजांनी यावर विजयाचा कळस चढवला. राजस्थानने ११ षटकांत प्रथम फलंदाजी करताना ११ षटकांत ३ बाद १५० धावा केल्या. तर मुंबईचा संघ प्रत्युत्तरात ११ षटकांत ९ बाद १२२ धावा करू शकला.



राजस्थानने दिलेल्या १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरूवात खूपच खराब झाली. पहिल्या षटकात रायन रिकल्टन झेलबाद झाला. तर सूर्या दुसऱ्या षटकात माघारी परतला. यानंतर तिसऱ्या षटकात रोहित शर्मा झेलबाद झाला. तर हार्दिक पंड्या व तिलक वर्मा पाचव्या षटकात माघारी परतले. मुंबईचे टॉप-५ फलंदाज फक्त ४६ धावांवर माघारी परतले.

झटपट ५ विकेट्स गमावल्यानंतर नमन धीर व शेरफेन रूदरफोर्डने संघाचा डाव सावरला. पण तुषार देशपांडने रूदरफोर्डला बाद करत मुंबईच्या पुनरागमनाच्या आशांवर पाणी फेरलं. त्यानंतर नमन धीर २५ धावा करत बाद झाला. मुंबई इंडियन्सचा संघ सर्वबाद होण्याच्या मार्गावर होता, पण बुमराह व चहरने कसंबसं अखेरचं षटक काढलं. यासह मुंबईचा संघ ११ षटकांत ९ बाद १२३ धावा करू शकला.

मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत राजस्थानला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. यशस्वी व वैभवने पहिल्या विकेटसाठी ३० चेंडू ८० धावांची भागीदारी रचली. वैभव सूर्यवंशी १४ चेंडूत ५ षटकार व एका चौकारासह ३९ धावा करत बाद झाला. तर यशस्वी जैस्वालने ३२ चेंडूत १० चौकार व ४ षटकारांसह ७७ धावांची नाबाद खेळी केली. तर रियान परागने २० धावांचं योगदान दिलं. यासह ११ षटकांत राजस्थानने १५० धावांची विक्रमी धावसंख्या रचली. मुंबईकडून अल्लाह गझनफरने २ विकेट्स तर शार्दुल ठाकूरने एक विकेट घेतली.

# गुजरातच्या ताफ्यात शुबमन गिलचं कमबॅक, तर दिल्लीचा 'हा' मॅचविनर खेळाडू बाहेर

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल २०२६ स्पर्धेत बुधवारी होणाऱ्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन्स हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. हा सामना दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे. या सामन्याआधी गुजरात टायटन्स संघासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. संघाचा कर्णधार शुबमन गिल दिल्ली कॅपिटल्स संघाविरूद्ध कमबॅक करणार असल्याची माहिती साई सुदर्शनने दिली आहे. एकीकडे गुजरात टायटन्स संघासाठी आनंदाची बातमी समोर येत आहे. तर दुसरीकडे दिल्ली कॅपिटल्स संघाचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे.

गेल्या सामन्यात शुबमन गिल खेळू शकला नव्हता. गिलच्या अनुपस्थितीत राशिद खान संघाचं नेतृत्व करताना दिसून आला होता. गुजरातला स्पर्धेतील सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. आता तिसऱ्या सामन्यात विजय मिळवून गुजरातचा संघ पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. त्यामुळे हा सामना गुजरातसाठी



अतिशय महत्वाचा असणार आहे. या महत्वाच्या सामन्यात गिल खेळणार असल्याची माहिती साई सुदर्शनने दिली आहे.

दिल्ली कॅपिटल्ससाठी चिंता वाढवणारी बातमी समोर येत आहे. वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क या सामन्यातही खेळताना दिसून येणार नाही. तो अजूनही दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, तो आणखी ३ सामने बाहेर राहू शकतो. माध्यमातील वृत्तानुसार, तो २० एप्रिलला संघासोबत जोडला जाऊ शकतो.

**आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी असा आहे गुजरात टायटन्सचा संघ**

शुबमन गिल (कर्णधार), साई सुदर्शन, जोस बटलर (यष्टीरक्षक), ग्लेन फिलिप्स, वॉशिंग्टन सुंदर, शाहरुख खान, राहुल तेवतिया, राशिद खान, कगिसो रबाडा, अशोक शर्मा, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, जेसन होल्डर, जयंत यादव, मानव सुथार, कुमार कुशाग्र, आर. साई किशोर, इशांत शर्मा, ल्यूक वुड, टॉम बँटन, कुलवंत खेजरोलिया, अनुज रावत, अर्शद खान, गुरनूर बराड, निशांत सिंधु.

**आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी असा आहे दिल्ली कॅपिटल्सचा संघ**

अक्षर पटेल (कर्णधार), केएल राहुल, करुण नायर, डेव्हिड मिलर, पथुम निसांका, साहील पारख, पृथ्वी शॉ, अभिषेक पोरेल, ट्रिस्टन स्टब्स, समीर रिझवी, आशुतोष शर्मा, विप्रज निगम, अजय मंडल, त्रिपुराना विजय, माधव तिवारी, अकिब डार, नितिश राणा, मिशेल स्टार्क, टी. नटराजन, मुकेश कुमार, दुष्मंथा चमीरा, लुंगी एन्गिडी, काइल जेमिसन, कुलदीप यादव.

# आवेश खानच्या अतिउत्साहामुळे लखनौ येणार अडचणीत; शेवटच्या षटकात ड्रामा

**कोलकाता/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 मध्ये, लखनौ सुपर जायंट्सने सनरायझर्स हैदराबादला पराभूत करून विजयासह आपल्या खात्याची सुरुवात केली. या विजयामुळे एक मोठा वादही निर्माण झाला. वेगवान गोलंदाज आवेश खानच्या एका कृतीची आता जोरदार चर्चा होत आहे. पंचांनी कोणतीही कारवाई केली नसली तरी, या घटनेमुळे एका नव्या वादाला तोंड फुटले आहे.

लखनौ विरुद्ध हैदराबाद सामन्याच्या शेवटच्या षटकात, जेव्हा ऋषभ पंतने जयदेव उनाडकटच्या गोलंदाजीवर विजयी चौकार मारला, तेव्हा डगआऊटजवळ उभ्या असलेल्या आवेश खानने आपल्या बॅटने चेंडू परत मैदानात मारला. आवेश खानने मारलेला चेंडू पूर्णपणे सीमारेषा ओलांडून गेला नव्हता. या घटनेमुळे सोशल मीडियावर एक चर्चा सुरू झाली, ज्यात काही लोकांच्या मते सनरायझर्स हैदराबादला पेनल्टी रन द्यायला हवा होता. नियमांनुसार, जर मैदानाबाहेरील कोणी खेळात हस्तक्षेप केला, तर चेंडू डेड बॉल घोषित केला जाऊ शकतो. क्रिकेटच्या नियमांनुसार (एमसीसी नियम 20.4.2), जर खेळावर बाह्य हस्तक्षेपामुळे परिणाम होत असेल, तर पंच चेंडू डेड घोषित करू शकतात. या प्रकरणात, कोणत्याही क्षेत्ररक्षकाने चेंडू थांबवण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे तो अयोग्य खेळ मानला गेला नाही. त्यावेळी सामना बरोबरीत होता आणि लखनौला विजयासाठी फक्त एका धावेची गरज होती. एका अनुभवी पंचांच्या मते, या परिस्थितीत चार धावांचा निर्णय बदलण्यास कोणताही आधार नव्हता. त्यामुळे, पंचांनी खेळ सुरू ठेवला आणि लखनौने सामना जिंकला.

सनरायझर्स हैदराबाद या निर्णयामुळे नाराज आहे. वृत्तानुसार, संघ या प्रकरणी बीसीसीआयकडे तक्रार करू शकतो. जरी नियमांनुसार, सामन्याचा निकाल आता बदलता येत नसला तरी, एसआरएच या संपूर्ण घटनेबाबत अधिकृत तक्रार दाखल करू शकते. गुणतालिकेत, एसआरएच 3 सामन्यांमध्ये 1 विजयासह पाचव्या स्थानावर आहे. तर, लखनौ सुपर जायंट्स 7 व्या स्थानावर आहे. दोन्ही संघांचे प्रत्येकी 2 गुण आहेत, पण हैदराबादचा नेट रन रेट चांगला आहे.

# 'या पराभवाची जबाबदारी त्यांचीच' पंड्याने पराभवानंतर कोणाची खरडपट्टी काढली

**मुंबई/वृत्तसंस्था :** मुंबई इंडियन्सला राजस्थानविरूद्धच्या सामन्यात २७ धावांनी लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. पावसामुळे गुवाहाटीमधील हा सामना उशिरा सुरू झाला, त्यामुळे सामना ११ षटकांचा खेळवण्यात आला. या ११ षटकांच्या सामन्यात राजस्थानच्या संघाने मुंबईला एकदाही सामन्यात पुनरागमनाची संधी दिली नाही. मुंबईच्या गोलंदाजीसमोर राजस्थानचा संघाने ११ षटकांत १५० धावांचा डोंगर उभारला. मुंबईच्या पराभवानंतर कर्णधार हार्दिक पंड्या चांगलाच संतापला.

हार्दिक पंड्याने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पावसाच्या हजेरीमुळे खेळपट्टी बराच काळ कव्हर्सखाली असल्याने गोलंदाजीला साथ मिळण्याची मोठी शक्यता होती. पण पहिल्याच चेंडूपासून वैभव सूर्यवंशी व यशस्वी जैस्वाल या जोडीने मुंबईच्या गोलंदाजांवर हल्लाबोल केला. या दोघांनी मिळून २.४ षटकांत ५० धावांचा पल्ला गाठला. तर ३.४ षटकांच्या पॉवरप्लेमध्ये ५९ धावा कुटल्या. वैभव सूर्यवंशी १४ चेंडूत ५ षटकार व एका चौकारासह ३९ धावा करत बाद झाला. तर यशस्वी जैस्वाल ३२ चेंडूत १० चौकार व ४ षटकारांसह नाबाद ७७ धावा करत माघारी परतला. तर रियान परागने १० चेंडूत २ षटकार व एका चौकारासह २० धावांचं योगदान दिलं. या तिघांच्या वादळी फटकेबाजीच्या बळावर राजस्थानने ११ षटकांत १५० धावा केल्या. तर प्रत्युत्तरात मुंबईचा संघ ११ षटकांत ९ बाद १२३ धावा करू शकला.



मुंबईच्या पॉवरप्लेमधील गोलंदाजीबद्दल बोलताना हार्दिक पंड्या गोलंदाजांवर चांगलाच संतापला. बोलतानाही त्याच्या चेहऱ्यावरचा राग व निराश स्पष्ट दिसत होती. हार्दिक म्हणाला, "मला वाटतं आम्ही ज्याप्रकारे गोलंदाजी करायला हवी होती, ती नीट करू शकलो नाही आणि त्यांनी खूप चांगली फलंदाजी केली. माझ्या मते आमच्या गोलंदाजांनी जबाबदारी घ्यायला हवी. गोलंदाजी विभाग म्हणून आम्ही अजिबात अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकलो नाही आणि त्यांनी उत्कृष्ट क्रिकेट खेळलं."

मुंबईकडून दीपक चहरने एका षटकात २२ धावा, बुमराहने ३ षटकांत ३२ धावा, ट्रेंट बोल्टने एका षटकात २२ धावा, हार्दिकने २ षटकांत १७ धावा तर शार्दुलने १ विकेट घेत २ षटकांत ३६ दावा दिल्या. याशिवाय अल्लाह गझनफरने २ षटकांत २ विकेट्स घेत सर्वात कमी २१ धावा दिल्या. मुंबईच्या अशा गोलंदाजीमुळे राजस्थान संघ विक्रमी धावसंख्या उभारण्यात यशस्वी ठरला. फलंदाजी अधिक चांगली व्हायला हवी होती का, या प्रश्नाचं उत्तर देताना हार्दिक म्हणाला, "मी या पराभवाचे खापर फलंदाजीवर मुळीच फोडणार नाही. ही पूर्णपणे गोलंदाजांची चूक होती आणि त्यांनीच या पराभवाची जबाबदारी घ्यायला हवी. टी-२० क्रिकेटमध्ये नेहमीचं योग्य वेळी चेंडू टाकणं महत्त्वाचं असतं आणि तुम्ही २७ धावांचा हिशोब पाहिला, तर त्याचा अर्थ असा आहे की आपण फक्त ५ चांगल्या चेंडूंबद्दल बोलतोय, ज्यामुळे ५ षटकार कमी बसले असते. जर आम्ही नियोजनानुसार अचूक चेंडू टाकले असते, तर आम्ही नक्कीच सामन्यात राहिलो असतो. पण जसं मी सांगितलं, त्यांच्या सलामीवीरांनी काही षटकांमध्येच आमच्यावर दबाव टाकून आम्हाला सामन्याबाहेर ढकललं. त्यानंतर आम्ही सतत पाठलाग करत राहिलो आणि शेवटी कमी पडलो."

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्रीदेवी म्हणजे लोकांचा संसार उद्ध्वस्त करणारी बाई... आईवर लागलेल्या डागावर जान्हवी काय म्हणाली?

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर हिने नुकताच झालेल्या एका मुलाखतीत स्वतःच्या खासगी आयुष्याबद्दल मोठे खुलासे केले आहेत. एवढंच नाही तर, दिवंगत आई श्रीदेवी यांच्या कठीण प्रवासाबद्दल देखील जान्हवी हिने सांगितलं आहे... श्रीदेवी यांनी 2018 मध्ये अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाला अनेक वर्ष झालीत, पण आईच्या निधनाच्या वेदना त्यांच्या मुलींच्या मना आजही ताज्या आहे... आईला गमावल्यानंतर आयुष्यात आलेला एकटेपणा... आजही त्यांच्या मुलींच्या आयुष्यातील पडती बाजू आहे... श्रीदेवी यांच्या निधनानंतर जान्हवी आणि खुशी यांचं आयुष्य पूर्णपणे बदललं आहे.नुकताच झालेल्या एका पॉडकास्टमध्ये जान्हवी कपूर म्हणाली, 'आईच्या निधनानंतर एका रात्रीत मोठं आणि समजदार व्हावं लागलं. आधी प्रत्येक गोष्टीसाठी आईवर अवलंबून होते. कोणते कपडे घालायचे आहेत, काय बरोबर आहे आणि काय चुकीच आहे... सर्वकाही आई ठरवत होती... पण आईच्या निधनानंतर सर्वत्र काही स्वतःचं स्वतःला करावं लागलं आणि तेव्हा आमच्या कुटुंबाबद्दल देखील नकोत्या चर्चा





झाल्या. आमच्या पडत्या काळात काही लोकांना आम्ही आमच्या आयुष्यात जागा दिली, पण त्यांनीच आमचा फायदा घेतला... 'जान्हवी म्हणाली, 'आईच्या जाण्यानंतर असं वाटलं फक्त आईलाच नाही तर, वडिलांना देखील गमावलं आहे...कारण आईसोबत त्यांची जी वागणूक होती, ती बदलली होती. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य... आईसोबत संवाद...आज जर आईला काही सांगायचं असेल तर, एकच गोष्ट सांगेल आणि ती म्हणजे, ती काय बोलत होती, ते मला आता कळत आहे... या गोष्टीचा पश्चाताप राहिल की, पूर्वी असं करु शकली नाही...'जान्हवी म्हणाली, 'आईने प्रचंड संघर्ष केला आहे... करियरच्या सुरुवातीला त्यांनी अनेक चांगल्या – वाईट गोष्टींचा सामना केला. पण तेव्हा लोकांनी त्यांच्यासोबत चांगलं वर्तन केलं नाही... लोकांचं संसार उद्ध्वस्त करणारी महिला असं देखील माझ्या आईला म्हणण्यात आलं. पण त्यांनी कधीच आम्हाला त्यांच्या आयुष्यातील वाईट दिवसांबद्दल सांगितलं नाही...'

सांगायचं झालं तर, बोनी कपूर यांचं पहिलं लग्न मोना कपूर यांच्यासोबत झालेलं. त्यांना दोन मुलं देखील आहेत. अर्जुन आणि अंशुला... असं असताना देखील बोनी कपूर यांनी श्रीदेवी यांच्यासोबत दुसरं लग्न केलं आणि जान्हवी आणि खुशी यांना जन्म दिला.


## दिशा वकानीचे वडील भीम वकानी यांचं निधन; घेतला जगाचा निरोप

टीव्ही अभिनेत्री दिशा वकानी उर्फ दयाबेनचे वडील, प्रसिद्ध नाटककार भीम वकानी यांचं वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झालं आहे. मयूर वकानी यांनी सांगितलं की, ते काही काळापासून आजारी होते. भीम वकानी यांनी अनेक वर्षे एक अभिनेता म्हणून काम केलं. त्यांनी नाट्य, दूरदर्शन आणि चित्रपट या तिन्ही क्षेत्रांत काम केलं. त्यांनी अहमदाबादमधील 'वकानी थिएटर्स'च्या बॅनरखाली नाटकांची निर्मिती, दिग्दर्शन आणि अभिनयही केला. वडिलांच्या दिग्दर्शनाखाली दिशानं 'मंगलफेरा' आणि 'पहलों सागो' यांसारख्या नाटकांमध्ये बालकलाकार म्हणून काम केलं.तारक मेहता का उल्टा चश्मा'चे निर्माते असित मोदी यांनी दिव्य भास्करसोबत झालेल्या संभाषणात सांगितलं की, 'मी त्यांना अनेक वर्षांपासून ओळखत होतो. जेव्हा मी अहमदाबादमध्ये ही मालिका बनवत होतो, तेव्हा आम्ही एकत्र काम केलेलं. त्यांनी आपल्या मुलीसाठी खूप मेहनत घेतली. त्यांनी आपल्या सर्व मुलांना कलेचं शिक्षण दिलं. त्यांचे आशीर्वाद माझ्यावरही होते. त्यांनी मुलांसाठी खूप काही केलं'दिलीप जोशी म्हणाले की, त्यांना दिशाबद्दल आदर होता. त्यांनी शाहरुख खानच्या 'स्वदेस' आणि माधुरी दीक्षितच्या 'लज्जा' सारख्या चित्रपटांमध्येही काम केलंय.दिशा वकानीचे वडील 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मध्येही दिसले होते.



## अल्लू अर्जुन सासऱ्यांपुढे झुकलेला, लग्नासाठी लावलेली लाडीगोडी

साऊथकडील सुपरस्टार अल्लु अर्जुनचे चाहते आजच्या काळात सर्वत्र पसरले आहेत. बॉलिवूडमध्येही त्याचे बरेचजण फॅन आहेत. पण तो मात्र त्याची पत्नी स्नेहाचाच चाहता आहे. बऱ्याच प्रसंगी तो पत्नीवर प्रेमाचा वर्षाव करत असतो. पाहताक्षणी तो पत्नीच्या प्रेमात पडला होता. आज अल्लू अर्जुनच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या लव्हस्टोरीबद्दल काही खास गोष्टी जाणून घेऊ. एका कुटुंबातील सद्याच्या लग्नासाठी अल्लू अर्जुन अमेरिकेला गेला होता आणि तिथेच त्याची स्नेहा रेड्डीशी भेट झाली. अल्लू पहिल्याच नजरेत स्नेहाच्या प्रेमात पडला; बरीच शोधाशोध केल्यानंतर त्याला तिचा फोन नंबर मिळवण्यात यश आले आणि त्याने तिच्याशी बोलायला सुरुवात केली.लाखो तरुणींच्या हृदयावर अधिराज्य गाजवणाऱ्या अल्लूला, पहिल्या नजरेत स्नेहा आवडू लागली होती. तिच्याशी संवाद साधण्यासाठी तो अत्यंत उत्सुक होता. कसाबसा मार्ग काढून, अल्लू अर्जुनने स्नेहाचा फोन नंबर मिळवला आणि या नात्याला पुढे नेले. या दोघांनीही एकमेकांना बराच काळ डेट केले होते.जेव्हा अर्जुनच्या वडिलांना स्नेहाबद्दल समजले, तेव्हा त्यांनी अल्लूशी लग्नाबाबत चर्चा केली. अल्लू स्नेहाच्या वडिलांना भेटला आणि त्याने लग्नाचा प्रस्ताव मांडला. मात्र, पहिल्याच भेटीत स्नेहाच्या वडिलांना अल्लू पसंत पडला नाही.स्नेहा रेड्डीच्या वडिलांनी सुरुवातीला अल्लू अर्जुनला नकार दिला होता; मात्र, या जोडप्याने हार मानली नाही. उलट, आपल्या कुटुंबांना समजावून सांगण्यासाठी त्यांनी पराकोटीचे प्रयत्न केले. अखेरीस, त्यांच्या प्रेमापुढे झुकून स्नेहाचे वडील नरमले आणि त्यांनी या लग्नासाठी आपली संमती दिली.कुटुंबीयांची संमती मिळवून आणि बराच काळ डेट केल्यावर अल्लू आणि स्नेहा यांनी 6 मार्च 2011 रोजी लग्न केले. या जोडप्याने दक्षिण भारतीय चालीरीतींनुसार लग्न केले.अल्लू अर्जुन आणि स्नेहा आज दोन मुलांचे पालक आहेत; या जोडप्याच्या मुलाचे नाव अयान अर्जुन आणि मुलीचे नाव अर्हा अर्जुन आहे.



## सरके चुनर प्रकरणात नोराच्या अडचणी वाढल्या, NCW कडून शेवटची संधी, संजय दत्तलाही समन्स

कन्नड चित्रपट 'केडी: द डेविल' मधील 'सरके चुनर तेरी सरके' या गाण्यावरून सुरू असलेला वाद आता वाढताना दिसतोय. या गाण्यातील आक्षेपार्ह शब्द आणि सादरीकरणामुळं राष्ट्रीय महिला आयोगानं (NCW) कडक पाऊलं उचलली असून, अभिनेत्री नोरा फतेहीला हजर राहण्यासाठी शेवटची संधी दिली आहे. तसंच, या प्रकरणी अभिनेता संजय दत्तलाही समन्स बजावण्यात आल्याची माहिती आहे. या प्रकरणात संजय दत्तला ८ एप्रिल रोजी आयोगासमोर उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.काही दिवसांपूर्वी 'केडी: द डेविल' चित्रपटातील 'सरके चुनर तेरी' हे गाणं प्रदर्शित झालं होतं. या गाण्याचे हिंदी शब्द आक्षेपार्ह तसंच दुहेरी अर्थाचे आणि महिलांचा अपमान करणारे असल्याचा आरोप नेटकऱ्यांनी केला होता. गाणं सोशल मीडियावर येताच नेटकऱ्यांनी संताप व्यक्त करत कलाकारांवर कारवाई करण्याची मागणीही केली होती.सोशल मीडियावर तीव्र संताप व्यक्त झाल्यानंतर केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने या गाण्यावर बंदी घातली असून यूट्यूबवरूनही हे गाणे हटवण्यात आले आहे.राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आहे. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान त्यांनी स्पष्ट केलं की, "सर्जनशीलतेच्या नावाखाली महिलांच्या सन्मानाशी तडजोड केली जाऊ शकत नाही."दरम्यान, नोराला यापूर्वी समन्स बजावण्यात आलं होतं, मात्र ती उपस्थित राहू शकली नाही. आता आयोगानं तिला २७ एप्रिल २०२६ रोजी प्रत्यक्ष हजर राहण्यासाठी शेवटची संधी दिली आहे.तर या गाण्यात नोरासोबत दिसलेला अभिनेता संजय दत्त यालाही आयोगानं चौकशीसाठी समन्स पाठवण्यात आले आहे. त्याला ८ एप्रिल रोजी आपली बाजू मांडण्यासाठी बोलावण्यात आलं आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक प्रेम आणि निर्मात्यांनी यापूर्वीच लेखी माफीनामा सादर केला आहे. हे गाणं समाजावर नकारात्मक परिणाम करणारं होतं, हे त्यांनी मान्य केलं आहे.तसंच या वादावर नोरानं आपली बाजू मांडताना सांगितलं की, तिनं हे गाणं तीन वर्षांपूर्वी केवळ कन्नड भाषेत शूट केलं होतं. हिंदी गाण्याचे शब्द इतके घाणेरडे असतील याची तिला कल्पना नव्हती आणि निर्मात्यांनी तिची परवानगी न घेताच हे व्हर्जन प्रसिद्ध केलंय.

# बुलढाण्यात नूतन जिल्हाधिकाऱ्यांचे जल्लोषात स्वागत; डॉ. किरण पाटील यांना भावपूर्ण निरोप...

## विकासकामे वेगाने पुढे नेण्याचा संकल्प-डॉ.प्रविणकुमार देवरे

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात ६ एप्रिल रोजी मावळते जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला, तर नूतन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांचे प्रशासनाच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. मावळत्या जिल्हाधिकाऱ्यांनी सुरू केलेली विकासकामे अधिक वेगाने पुढे नेण्याचा संकल्प डॉ. देवरे यांनी व्यक्त केला. दिमाखदार सोहळ्यात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, डॉ. पाटील यांच्या पत्नी शीला पाटील, तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, विविध विभागांचे विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नूतन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी यावेळी म्हणाले, बुलढाणा जिल्ह्यातील पूर्वीचा कामाचा अनुभव गाठीशी असल्याने मला येथील परिस्थितीची जाण आहे. आगामी काळात निर्यात, कृषी, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांवर विशेष भर देऊन जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्याचा मानस आहे. डॉ. पाटील यांनी घडवलेली अधिकाऱ्यांची टीम जबरदस्त असून, त्यांच्या सहकार्याने विकासाचा ध्यास पूर्ण करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मावळते जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आपल्या निरोपपर भाषणात जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या एकजुटीचे आणि कार्यपद्धतीचे कौतुक केले. ते म्हणाले आज महाराष्ट्रात बुलढाणा जिल्हा विकासकामांमध्ये अग्रेसर आहे, असे त्यांनी अभिमानाने सांगितले. अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी कामाचे नियोजन, पूर्वतयारी, पारदर्शकता आणि नियमित वृत्तपत्र वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. पशुसंवर्धन आयुक्तपदी पदोन्नतीबद्दल बोलताना, मुक्या प्राण्यांची सेवा ही पुण्याची बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. डॉ. पाटील यांच्या कार्यकाळात जलयुक्त शिवार, महसूल सुधारणा, लोणार सरोवर संवर्धन आणि दस्तावेजांचे डिजिटायझेशन, महसूल मित्र, सुलभ चॅटबॉट सेवा, ई-महसूल, डॅशबोर्ड, सहज प्रणाली इ. सारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे जिल्ह्याने लक्षणीय प्रगती साधली आहे. स्वागत व निरोप सभारंभाला उपस्थितांनी डॉ. किरण पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत नूतन जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महसूल तहसीलदार वृषाली केसकर यांनी केले.

## डॉ. प्रविणकुमार पितांबर देवरे यांची उल्लेखनीय कारकीर्द

जनसंचलन/ बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार पितांबर देवरे(-२०१३) यांनी आपल्या प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कार्य करत राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कारकीर्दबाबतची माहिती याप्रमाणे: डॉ. देवरे यांनी ... .. ही शैक्षणिक पात्रता प्राप्त करून २०१३ साली भारतीय प्रशासकीय सेवेत () प्रवेश केला. यापूर्वी ते आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे या पदावर कार्यरत होते. डॉ. देवरे यांनी कारकीर्दीची सुरुवात १९९६ साली परिविक्षाधीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी, भंडारा येथे केली. त्यानंतर राजुरा (चंद्रपूर) व अकोला येथे उपविभागीय अधिकारी, बुलढाणा येथे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून २००४ ते २००७ या कालावधीत निवासी उपजिल्हाधिकारी होते. नाशिक येथे सहआयुक्त तर अहमदनगर येथे उपजिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्या. तसेच सोलापूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे येथे अतिरिक्त आयुक्त, नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात उपआयुक्त() तसेच पुणे येथे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली. आयएएस अधिकारी म्हणून त्यांनी संचालक ओबीसी पुणे, , पुणे व पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त या पदांवर कार्य करताना महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. डॉ. देवरे यांच्या नेतृत्वाखाली पशुसंवर्धन विभागाने ङ्क्ष ()फ्र योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्याला प्रथम क्रमांक मिळवून दिला आहे. तसेच ङ्क्ष२१ वी पशुगणनाफ्र निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नियोजन अधिकारी म्हणून काम केले असून, अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ८००० घरांची उभारणी केली आहे. क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेसाठी १ लाख घरांचे नियोजन करण्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. याशिवाय, आपत्ती व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक म्हणून त्यांनी कार्य केले असून, अहमदनगर व सोलापूर येथे राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनासाठी मध्यस्थ म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातील सर्व १८ तांत्रिक बाबींची पूर्तता त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच विभागाच्या इतिहासात प्रथमच व यांची समुपदेशनाद्वारे बदली प्रक्रिया राबविण्यात आली. अकोला येथे महसूल कामकाज व पूर व्यवस्थापनासाठी ङ्क्षसर्वोत्कृष्ट महसूल अधिकारीफ्र पुरस्काराने २००४ मध्ये सन्मानित करण्यात आले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

(गुंतवणुक रक्कम: ५०० ते ५०००)

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# बुलढाणा जिल्ह्यात जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील क्षेत्रीय प्रशिक्षणास प्रारंभ

जनसंचलन/बुलढाणा

जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीचा भाग म्हणून, पहिल्या टप्प्यातील क्षेत्रीय प्रशिक्षकांचे (फिल्ड ट्रेनर) जिल्हास्तरीय प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात उत्साहात सुरू झाले आहे. हे प्रशिक्षण ११ एप्रिल २०२६ पर्यंत चालणार असून, याद्वारे आगामी जनगणनेच्या तांत्रिक आणि क्षेत्रीय कामाची पायाभरणी केली जात आहे. या पाच दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवार, ६ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबतच जनगणना संचालनालयाच्या कार्यालयातील सांख्यिकी अन्वेषक (ग्रेड २) पवन घोडे आणि मयूर पवार यांनी मार्गदर्शन केले.

यावेळच्या जनगणनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही प्रक्रिया डिजिटल स्वरूपात पार पडणार आहे. प्रशिक्षणादरम्यान क्षेत्रीय प्रशिक्षकांना डिजिटल जनगणनेची माहिती, मोबाईल ॲपचा वापर आणि माहिती संकलित करण्याच्या आधुनिक पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.



जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये मास्टर ट्रेनर म्हणून संजय खडसे (उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा) व डॉ. रामेश्वर पुरी (उपविभागीय अधिकारी, खामगाव) हे अधिकारी क्षेत्रीय प्रशिक्षकांना सखोल प्रशिक्षण देत आहेत. या जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व नियुक्त क्षेत्रीय प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रशिक्षित फिल्ड ट्रेनर पुढे जाऊन प्रत्यक्ष जनगणनेच्या कामात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

# बुलढाणा जिल्ह्याची उद्योजकतेकडे यशस्वी झेप

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील स्थानिक उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात () बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या आकडेवारीनुसार, जिल्ह्याने आपल्या मंजुरीचे १०० टक्के उद्दिष्ट साध्य करून अमरावती विभागात आणि राज्यस्तरावर आपले स्थान बळकट केले आहे. बुलढाणा जिल्ह्यासाठी या वर्षाकरिता एकूण ७८० अर्जांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. बँकांनी या सर्व ७८० अर्जांना मंजुरी देऊन जिल्ह्याचे उद्दिष्ट पूर्णत्वास नेले आहे. या यशातून जिल्ह्याने स्थानिक तरुणांना आर्थिक पाठबळ देण्यात आघाडी घेतली आहे. मार्जिन मनी मंजुर झालेल्या ७८० अर्जांसाठी एकूण १२८७.२४ लाख रुपयांचा मार्जिन मनी निधी निश्चित करण्यात आला आहे. आतापर्यंत २३७ अर्जांसाठी ५३०.३४ लाख रुपयांचे प्रत्यक्ष वितरण पूर्ण झाले असून, यामुळे अनेक नवीन उद्योगांना प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. अमरावती विभागामध्ये बुलढाणा जिल्ह्याने आपली प्रगती कायम राखली असून बुलढाणा जिल्हा विभागात तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच राज्यात सांगली आणि कोल्हापूर सारख्या उद्योगात आघाडीवर असलेल्या जिल्ह्यांच्या तुलनेत बुलढाणा १०० टक्के कामगिरीसह प्रगतीपथावर आहे. बुलढाणा जिल्ह्याने साध्य केलेले हे यश जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणारे ठरणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या नियोजनामुळे आणि बँकांच्या सहकार्यामुळे हे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे शक्य झाले आहे.

# एचपीव्ही लसीकरणाविषयी जागरूकता वाढविण्यासाठी कार्यशाळा संपन्न...




जनसंचलन/बुलढाणा

महिलांमध्ये वाढत्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या ( ) प्रमाणावर नियंत्रण मिळवण्यासाठी एचपीव्ही संक्रमणाविषयी जिल्ह्यात जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुलढाणा येथील अर्बन हॉल, कारंजा चौक येथे महिला डॉक्टरांसाठी एचपीव्ही लसीकरण विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेत तज्ज्ञ डॉक्टरांनी एचपीव्ही विषाणूचा प्रसार, त्याचे दुष्परिणाम तसेच एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विशेषतः किशोरवयीन मुलींना योग्य वयात लसीकरण केल्यास गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून मोठ्या प्रमाणात संरक्षण मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेदरम्यान सहभागी महिला डॉक्टरांनी आपले अनुभव मांडले. शंका-निरसन सत्र घेण्यात आले असून, आधुनिक लसीकरण पद्धतींवरही सखोल चर्चा करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागात एचपीव्ही लसीकरणाचा प्रसार वाढवण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. कार्यशाळेचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, बुलढाणा व निमा वुमन्स फोरम, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी रायपूर डॉ. शिल्पा खराटे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे नियोजन डॉ. वैशाली पडघाण व निमा वुमन्स फोरम यांनी केले. या कार्यशाळेस बुलढाणा तालुक्यातील अनेक महिला डॉक्टर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एचपीव्ही लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती करण्याचा संकल्प केला.

# लोणार येथे योग महोत्सवाचे केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

## एकाच वेळी ६ हजार साधकांनी केला त्रिकोनासन: एशियन बुक ऑफ इंडीया मध्ये नोंद

जनसंचलन/ बुलढाणा

योग हा केवळ शारीरिक व्यायाम नाही. योग ही एक समग्र जीवनशैली आहे जी शरीर, मन आणि आत्मा यांच्यात संतुलन निर्माण करते. योग आपल्याला मानसिक शांती, शारीरिक सुदृढता आणि सकारात्मक जीवनदृष्टी देतो. आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीत योगाचे महत्त्व अधिकच वाढले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आंतरराष्ट्रीय योग दिनाला ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा प्रचार प्रसार व्हावा, या दृष्टिकोनातून केंद्रीय आयुष्य बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या काठावर करण्यात आले होते. या योग महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय आयुष्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आज सकाळी झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी आयुष विभागाच्या




सहसचिव मोनालिसा दास, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्यासह माजी आमदार संजय रायमुलकर, राजश्री प्रतापराव जाधव, आयुक्त रमेश चौहाण, मोरारजी देसाई संस्थाचे डॉ. काशिनाथ, नगराध्यक्ष, लोणार मीराताई भूषण मापारी, प्रकाश जी मापारी, बळीरामजी मापारी, आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी संघटनाचे अनंत बिरादार, उपस्थित होते. प्रतापराव जाधाव म्हणाले की, आज जगासमोर असलेल्या गैर-संचारी रोगांच्या वाढत्या आव्हानाला तोंड देण्यासाठी योग अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. नियमित योगाभ्यास, प्राणायाम आणि ध्यान यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणाव यांसारख्या अनेक समस्यांवर नियंत्रण मिळवता येते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८